0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) दक्षता शाखेकडून दिनांक २३/१०/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७१/२०१२/जा.७३९, दिनांक २३/१०/२०१२.
३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७१/२०१२/जा.७४०, दिनांक २३/१०/२०१२.
४) गाळा क्र. १६ चे मालक संजय भगीरथमल अग्रवाल याचे दिनांक १६/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.
५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ पूर्व यांचे दिनांक २०/११/२०१२ रोजीचे अभिवेदन.
६) गाळा क्र. १६ चे मालक संजय भगीरथमल अग्रवाल, मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव रावजी शामजी बेरा, मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा तथा मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा मालक सुदाम रामभाऊ सानप यांचे दिनांक २०/११/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.
७) मोटार क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चा चालक रघुनाथ कसबे, मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा चालक असलम खान व मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा चालक आरीफ मोहम्मद मणियार यांचे दिनांक २१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त स्वतंत्र लेखी निवेदने.
८) मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ व मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा मालक सुदाम रामभाऊ सानप यांचे दिनांक २७/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७१/२०१२/जा. ४४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक :- १५ /०१/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १८/१०/२०१२ रोजी साई सेक्शन, विभागातील अनुग्रह सोसायटीच्या शिवम अपार्टमेंटमधील गाळ्यामध्ये व समोरील रस्त्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या अनुदानित दराच्या गव्हाच्या साठ्याचा अनधिकृतरित्या हस्तातंरण व काळ्याबाजारात घेऊन जाण्याचा अवैध धंदा होत असल्याचे या

कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचासह उक्त ठिकाणी पोहचले. सदर ठिकाणी साई सेक्शन येथे असलेल्या अनुग्रह सोसायटीच्या शिवम अपार्टमेंटमधील गाळ्यासमोर रस्त्याच्या कडेला सोसायटीचे मेन गेटच्या जवळ तीन माल मोटार ट्रकमधील अन्नधान्याचा साठा हे तेथे उपस्थित असलेले इसम काही मजुरांच्या सहाय्याने गाळा क्रमांक १६ मध्ये उतरवून घेण्याच्या तयारीत असल्याचे अधिकाऱ्यांच्या पंचांसमक्ष दृष्टीपथास आल्याने अधिकारीवर्गाने एकमेकांना इशारा करुन सदरचे ट्रक हे तेच असल्याचे खाणाखुणाने सुचित केले व ट्रकच्या दिशेने पाठलाग करण्याच्या तयारीने ट्रककडे जात असतानाच ट्रकमधील मजुर व ट्रक चालक हे अंधाराचा फायदा घेऊन ट्रक सोडून पळून गेले. अधिकारी वर्ग व पंच यांनी ट्रकजवळ जाऊन ट्रकची पाहणी केली असता, सदर ट्रकमध्ये काळा पट्टा असलेल्या ज्युटच्या बारदानामध्ये अन्नधान्याच्या गोणी असल्याचे दिसून आले. अधिकारीवर्गाने पंचांसमक्ष ट्रकमधील गोण्यांची पाहणी केली असता, गोण्यांमध्ये गव्हाचा साठा भरलेला असल्याचे व गोण्यांवर भारतीय खाद्य निगम असा छापा असल्याचे व हिरव्या रंगाच्या धाग्याने मशिनची शिलाई असल्याचे दिसून आल्यावरुन सदरचा साठा हा सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप करावयाचा असल्याची अधिकाऱ्यांना पक्की खात्री झाली.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गाळा क्रमांक १६ मध्ये असलेल्या गव्हाच्या साठ्याची पाहणी करुन मोजदाद केली असता, एकूण ८६ बाचकी गव्हाने भरलेला साठा असल्याचे दिसून आले. सदर तिन्ही ट्रक व त्यांमधील तसेच गाळा क्रमांक १६ मध्ये असलेला गव्हाचा साठा अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जप्त केला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकुण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | माल मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ मधील गव्हाने भरलेला २२० बाचकी साठा (प्रत्येकी ५० किलो) | ११००० कि.ग्रॅ. | १,९८,०००/- |
| २ | माल मोटार क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ मधील गव्हाने भरलेला २२० बाचकी साठा (प्रत्येकी ५० किलो) | ११००० कि.ग्रॅ. | १,९८,०००/- |
| ३ | माल मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ मधील गव्हाने भरलेला २२० बाचकी साठा (प्रत्येकी ५० किलो) | ११००० कि.ग्रॅ. | १,९८,०००/- |
| ४ | उपरोक्त तीन मालमोटार ट्रक (प्रत्येकी रुपये ५,५०,०००/- प्रमाणे) | ३ नग | १६,५०,०००/- |
| ५ | गाळा क्र. १६ मधील गव्हाने भरलेल्या व हात शिलाईने बंद असलेला ८६ बाचकी साठा (प्रत्येकी ५० किलो) | ४३०० कि.ग्रॅ. | ७७,४००/- |
| | | एकूण | २३,२१,४००/- |

CONTROLLER OF RATIONING

तद्नंतर दिनांक १९/१०/२०१२ रोजी सकाळी ०९:०० वाजताचे सुमारास सदरची कारवाई सुरु असताना एक इसम घटनास्थळी हजर झाला. त्याने त्याचे नाव रावजी शामजी बेरा असे सांगून सदरचे तिन्ही ट्रकमधील साठा हा त्यांच्या मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचा असून दिनांक १८/१०/२०१२ रोजी भिवंडी येथील भारतीय खाद्य निगमच्या गोदामातून माहे ऑक्टोबर २०१२ च्या नियतनातील वितरण आदेश क्र. १५३५२ वरील साठ्यापैकी एकूण ६६० बाचकी साठा गैरलाभार्थी गव्हाचा साठा शिधावाटप कार्यालय क्र. ४६ फ अंबरनाथ यांचे विभागातील अधिकृत शिधावाटप दुकानातील वितरीत करण्यासाठी सायंकाळी ०६:१५ वाजताचे सुमारास भरुन घेतले असल्याचे व त्यांच्या संस्थेस संलग्न असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांना वितरीत करण्याचे त्यांची व त्यांच्या संस्थेची जबाबदारी असल्याचे सांगून माननिय नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार अन्नधान्याचा ट्रक भरल्यानंतर सर्वप्रथम संबंधित शिधावाटप कार्यालयात नोंदणी करुन शिधावाटप अधिकारी यांनी नेमून दिलेल्या शिधावाटप निरिक्षकासमवेत व समक्ष शिधावाटप दुकानांना अन्नधान्याचे वितरण करणे आवश्यक असल्याचे त्याला माहित असल्याचे सांगितले. तथापी, अधिकाऱ्यांनी जप्त केलेल्या वरील नमूद तिन्ही ट्रकच्या चालकांना जप्त केलेल्या ठिकाणी रात्रीचेवेळी नेहमीप्रमाणे अंधाराचे ठिकाणी उभे करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या होत्या. दिनांक १८/१०/२०१२ रोजी ११:५० वाजता त्याच्या तिन्ही ट्रकच्या चालकांकडून त्याला समजले की, त्यांच्या ट्रकचा पाठलाग काही अधिकारी करीत असल्याने तसेच त्यावेळेस ते नेहमीप्रमाणे साई सेक्शन अनुग्रह को.ऑ.हौ.सो. मधील शिवम अपार्टमेंट तळमजल्यावरील गाळा क्र. १६ मध्ये काही मजुरांच्या सहाय्याने सदर ट्रकमधील गव्हाच्या गोण्या सदरच्या गाळ्यात उतरवयाच्या तयारीत असतांना अधिकारी उपस्थित झाल्याने त्यांचे तिन्ही चालक व मजुर अंधाराचा फायदा घेऊन पसार झाल्याचे त्याला समजल्याचे त्यांनी सांगितले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष उपस्थित रावजी शामजी बेरा यांचेकडे सदरच्या गाळा क्र. १६ बाबत विचारणा केली असता, सदरचा गाळा हा संजय अग्रवाल नामे इसमाचा असून त्याने यापूर्वीही शासन नियंत्रित दराचा अन्नधान्याचा साठा हा संजय अग्रवाल याने केलेल्या मागणीनुसार त्यास विक्री केला असून, सद्य:स्थितीत सदर गाळ्यामध्ये साठवणूक केलेला अन्नधान्याचा साठा हा यापूर्वी केलेल्या विक्रीपैकीच असल्याचे त्याने अधिकाऱ्यांना सांगितले.

तद्नंतर गाळा क्र. १६ मधील गाळ्यामध्ये गव्हाचा साठा आढळून आल्याने आजूबाजूच्या गाळ्यातही तसा साठा लपवून ठेवण्यात आला आहे का ? याची खातरजमा करण्यासाठी गाळा मालकांना उपस्थित राहून त्यांच्या गाळ्यात कसला साठा केला आहे, याची खातरजमा करण्यासाठी पंचांसमक्ष गाळा उघडून दाखविण्यास सांगण्यात आले असता, गाळा क्र. ०९, ११, १३ या गाळ्यांचे मालक वगळता इतर सर्व गाळा मालकांनी आपले गाळे उघडून दाखविले. सदर इमारतीचे बिल्डर व सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी संपर्क करुनही गाळा क्र. ०९, ११ व १३ च्या

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
[MUM]BAI

मालकांशी संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर अधिकाऱ्यांनी नजिकच्या पोलिस ठाण्यास वर्दी दिली. त्यानुसार थोडयाच वेळात शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे अधिकारी/कर्मचारी घटनास्थळी हजर झाले. त्यांचे उपस्थित अधिकाऱ्यांनी सदर शिवम अपार्टमेंटमध्ये असलेल्या बंद गाळ्याची झडती घेण्यास सुरुवात केली. गाळा क्र. ०९, ११, १३ या गाळ्यांचे गाळाधारक उपस्थित न झाल्याने पथकातील अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष व पोलिसांचे समक्ष कारवाई करुन त्याचा स्वतंत्र पंचनामा केलेला आहे. वरील नमूद गाळ्यांपैकी गाळा क्र. १६ वगळता इतर सर्व गाळ्यांमध्ये अन्नधान्याचा कसलाही साठा आढळून आला नाही. त्यानंतर अधिकाऱ्यांनी जप्त मुद्देमालाच्या साठ्यातील नमुने पंच व उपस्थित रावजी शामजी बेरा याचे समक्ष घेतले.

अशाप्रकारे शासन नियंत्रित दराचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोरगरीब शिधापत्रिकाधारकांना अनुदानित दराने शिधापत्रिकेवर वितरीत करावयाचा अन्नधान्याचा साठा अनधिकृतरित्या खाजगी गोदामामध्ये गैरमार्गाने उतरवून घेऊन नियंत्रित वस्तूंची साठेबाजी करुन खुल्या बाजारभावाप्रमाणे त्याची अवैध विक्री करुन ज्यादा नफेखेरीचा उद्देश स्पष्ट होत असल्याने आरोपी १) रावजी शामजी बेरा २) संजय अग्रवाल, ३) पाहिजे आरोपी तिन्ही ट्रकचे चालक यांनी आपापसात संगनमत करुन शिधापत्रिकेवरील वाटपाचा गहू त्यांना दिलेल्या निर्देशानुसार वाटप करावयाच्या दुकानात पुरवठा केलेला नसल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८, २) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६, ३) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ६, ४) दि प्रिव्हेंशन ऑफ ब्लॅक मार्केटिंग ॲण्ड मेन्टनन्स ऑफ सप्लाईज ऑफ इशेनशिअल कमोडिटिज ॲक्ट १९८० तसेच ५) पी.डी.एस. कंट्रोल ऑर्डर २००१ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा नोंद क्र. II १९/२०१२ दिनांक १९/१०/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २०/११/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस शिवाजीनगर पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहायक पोलिस निरिक्षक श्री. डी. ए. चव्हाण यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन

CONTROLLER OF RATIONI

सादर केले. तसेच सदर सुनावणीस गाळा क्र. १६ चे मालक संजय भगीरथमल अग्रवाल, मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव रावजी शामजी बेरा, मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ व मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा मालक सुदाम रामभाऊ सानप यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## <u>युक्तिवाद</u> :-

गाळा क्र. १६ चे मालक संजय भगीरथमल अग्रवाल याचे दिनांक १६/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक १९/१०/२०१२ रोजी त्याच्या मे. अग्रवाल ट्रेडर्स, गाळा नं. १६, अनुग्रह को.ऑप.हौ.सो., सत्यम बिल्डिंग, साई सेक्शन, अंबरनाथ (पूर्व), जिल्हा ठाणे या पत्त्यावर आपल्या कार्यालयाच्या दक्षता पथक यांनी त्याच्या गोदामावर धाड टाकली होती. त्याच्या गोदामात ८६ कट्टे (प्रत्येक ५० कि) गहुचा साठा होता. सदर गहु रेशनिंगचा नसून खुल्या बाजाराचा होता. परंतू आपल्या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी त्याच्याशी सदर गव्हाचे खरेदी बिल व काही कागदपत्रांची चौकशी न करता परस्पर त्याच्यावर फौजदारी गुन्हा अंबरनाथच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ाा १९/२०१२ नोंदविण्यात आला. त्याची अशी विनंती आहे की, त्याच्या गोदामात असलेला गव्हाचा साठ्याची फेरतपासणी व्हावी व त्याचे कागदपत्र तपासून घ्यावे. कारण त्याच्यां विरुध्द दिलेल्या फिर्यादमध्ये त्याचा गव्हाचा त्याचा बारदान वगैरहचा कांहीही उल्लेख केलेला नाही. त्याच्यावर आपल्या अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल केलेला असून आपण त्याची फेरचौकशी करुन त्याला न्याय द्यावे, अशी विनंती केली आहे.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित शिवाजीनगर पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहायक पोलिस निरिक्षक श्री. डी. ए. चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, आरोपीत यांनी सामायीक इरादा मनामध्ये बाळगुन शासन नियंत्रीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोरगरीब शिधापत्रिकाधारकांना अनुदानित दराने शिधापत्रिकेवर वितरीत करावयाचा अन्नसाठा (गहु) अधिकृतरित्या खाजगी गोडावूनमध्ये उतरवून घेऊन नियंत्रित वस्तूंची खुल्या बाजारभावाप्रमाणे विक्री करुन नफा कमावण्याच्या उद्देशाने साठेबाजी केली. तसेच गुन्ह्यातील जप्त अन्नसाठा पोलिस ठाण्याच्या आवारात ट्रकमध्ये ठेवलेला आहे. सदरचा अन्नसाठा हा गोरगरीब शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्याकरिता शासनाच्या वतीने देण्यात आलेला असून सदरचा अन्नसाठा नाशवंत असल्यामुळे खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गाळा क्र. १६ चे मालक संजय भगीरथमल अग्रवाल यांनी युक्तीवाद केला की, त्याचा श्री. संजय भगीरथमल अग्रवाल या नावांवर व मे. अग्रवाल ट्रेडर्स, गाळा नं. १६,

अनुग्रह को.ऑप.हौ.सो., सत्यम बिल्डिंग, साई सेक्शन, अंबरनाथ (पूर्व), जिल्हा ठाणे या पत्त्यावर दुकानाचा गाळा आहे. सदर गाळ्यामध्ये तो गहुचा खरेदी विक्रीचा घाऊक व्यापार करीत आहे. दिनांक १९/१०/२०१२ रोजी सकाळी ९.३० वा. अंबरनाथचे शिधावाटप अधिकारी श्री. धामसे यांनी त्याला त्याच्या मोबाईल क्र. ९४२२६६२०४९ वर फोन करुन वरील दिलेल्या गाळ्यावर गाळयाची चावी घेऊन बोलावून घेतले. तो त्याच्या गाळ्यावर गेला. तेव्हा फ परिमंडळाचे उपनियंत्रक श्री. शेवाळे व त्यांच्या समवेत प्रधान कार्यालयाचे दक्षता पथकाचे काही अधिकारी व अंबरनाथ शिधावाटप कार्यालयाचे अधिकारी सह १२ ते १५ अधिकारी यांच्यासमोर त्याने त्याचा गाळा उघडला. त्याच्या गाळ्यात ८६ कट्टे गहू प्रत्येकी ५० किलो असे शिल्लक होते. सर्व शिधावाटप अधिकारी यांनी गव्हाचा साठा तपासला सदरचा साठा रेशनिंगचा नव्हता व त्यांनी पाहुन गाळा बंद केला व चावी त्यांच्याकडे ठेवली व त्याच्याशी खरेदी बिल व गाळ्याचे कागदपत्र मागवून त्याची प्रत आपल्याकडे ठेवली व त्याला सायंकाळी ५.०० वा. सर्व तपासणी झाल्यानंतर त्यांनी तुमचे काम नाही म्हणून जाण्याकरिता सांगितले व काम लागल्यास तुम्हाला परत बोलविण्यात येईल असे सांगितले व तो तेथून निघुन गेला. तो निघून गेल्यानंतर त्यांनी त्याच्यावर पुढीलप्रमाणे खोटी फिर्याद तयार केली, अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रात वितरण करण्यासाठी गैरलाभार्थी गव्हाचे तीन ट्रक त्याच्या गोदामाच्या ३०० मीटर अंतरावर उभे होते. सदर ट्रक सुरज ग्रेन असोसिएशन यांचे नावे होते. सुरज ग्रेन यांच्याशी त्याच्या गोदाम बाबत काही घेणे देणे नव्हते. तरी आपल्या अधिकाऱ्यांनी सदर ट्रकचा गहू त्याच्या गोदामात खाली होणार होते असे संशय धरुन त्याच्यावर व इतरांवर अंबरनाथ पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल केला. अधिकाऱ्यांनी आपल्या फिर्यादीमध्ये नेहमीप्रमाणे रेशनिंगचा गहू त्याच्याकडे खाली होत असल्याचे व त्याच्या रेशनिंगचा गव्हाचा शिल्लक साठ्यापैकी त्याच्या गोदामात शिल्लक साठा दर्शविला आहे. अगर पहिले सुध्दा त्याचे गोदामात रेशनिंगचा गहु उतरविण्यात आला असेल तर आपल्या शिधावाटप निरीक्षक व शिधावाटप अधिकारी यांचा समवेत व निर्देशानुसार गव्हाचे ट्रक खाली करण्यात येत आहे. तर आपल्या निरीक्षक व अधिकारी यांचा संगनमताशिवाय ट्रक त्याच्या गोदामात खाली होऊ शकत नाही. अगर त्याचा गहू रेशनिंगचा असेल तर आपण अंबरनाथ शिधावाटप अधिकारी व निरिक्षकांवर सुध्दा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याच्या गोदामात असलेल्या गव्हाचे खरेदी बिल व कागदपत्राचा उल्लेख न दाखवता त्याने आपल्या अधिकाऱ्यांची पैसेंची मागणी पूर्ण केली नसल्यामुळे त्याच्यावर खोटा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याची अशी विनंती आहे की, त्याच्या गोदामात शिल्लक असलेल्या ८६ कट्टे गव्हाची आपण परत पोलिस व पंचासमोर पाहणी करुन फेरतपासणी करावी व त्याचा बारदान व मालाचा खुलासा पंचनामामध्ये करावा व त्याचे खरेदी बिल पहावे व आपण असे पैसेसाठी खोट्या फौजदारी गुन्हा नोंद करणाऱ्या अधिकाऱ्यांवर चौकशी करावी. त्याने कोणत्याही प्रकारचा गुन्हा

CONTROLLER OF RATI... HEA... MU...

केला नसून त्याच्यावर खोटा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आपण याची सखोल चौकशी करुन त्याला न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव रावजी शामजी बेरा यांनी युक्तीवाद केला की, दिनांक १८/१०/२०१२ रोजी सायंकाळी गैर लाभार्थी गव्हाचे पाच ट्रक अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रात वितरण करण्यासाठी आले होते. सदर पाच ट्रकपैकी दोन ट्रक त्याचदिवशी शिधावाटप दुकानांमध्ये वितरण करण्यात आले. त्या शिधावाटप दुकानांमध्ये आपल्या अधिकाऱ्यांनी भेट देवून खात्री करुन घेण्यात आले होती व बाकी तीन ट्रक साई सेक्शन येथे जसे भारतीय खाद्य निगमचा गोदामातून भरुन आले होते. तसेच शिधावाटप दुकानामंध्ये वितरण करण्यासाठी उभे होते व सदरची गोष्ट शिधावाटप अधिकारी यांना माहित होती. कारण त्यांना सांगून ट्रक तेथे उभे केले होते. त्याच्या ट्रकमध्ये त्यांनी किंवा त्यांच्या ड्रायव्हरनी एकही बाजका किंवा पोती शिधावाटप दुकानांशिवाय बाहेर उतरविलेला नाही. तरी आपल्या अधिकारी यांनी खोटा संशय धरुन थोड्यासा दुरी वर श्री. संजय अग्रवाल यांचा गोदाम आहे असे दाखवून त्या गोदामात सदरचा गाड्यां खाली होणार होते असे खोटे संशय दाखवून त्यांच्या असोसिएशनवर व गाड्यांचा ड्रायव्हर वर खोटा फौजदारी गुन्हा दाखल केला. शिधावाटप अधिकारी यांनी त्यांचे तीन ट्रकने शिधावाटप दुकानांसाठी गहू वितरण करण्यासाठी आले होते तोच जबरदस्ती ने जप्त करण्यात आला असे दाखविले. शासनाचाच माल त्यांनी वितरण करण्यासाठी आणलेला गहू शिधावाटप अधिकारी यांनीच खोटा संशय दाखवून गहू जप्त करुन घेतला. त्यांचे तिन्ही ट्रक भरलेले जसे गोदामातून आले त्याच परिस्थितीत उभे असतांना त्यांनी कोठे ही गहू विकला नसून त्यांच्या संस्थेवर आपल्या अधिकारी यांनी खोटा फौजदारी गुन्हा दाखल केलेला असून आपण याची चौकशी करुन त्यांना न्याय मिळवून द्यावेत, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा तथा मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा मालक सुदाम रामभाऊ सानप यांनी युक्तीवाद केला की, आपल्या कारणे दाखवा नोटीसीमध्ये उल्लेखलेल्या मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ व मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा तो मालक आहे. दिनांक १८/११/२०१२ रोजी त्याचे दोन्ही ट्रक अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रासाठी मे. सुरज ग्रेन असोशिएशनच्या नांवे प्रत्येकी २२० कट्टे गैरलाभार्थी गहुचे वितरण करण्यासाठी भारतीय खाद्य निगमच्या भिवंडी आगारातून भरुन सायंकाळी ६.१५ वा. निघाले व रात्री ८.०० वाजता अंबरनाथच्या साई सेक्शन येथे पोहचले आणि तेथे पार्किंग करण्यात आले. सदरील ट्रक गैर लाभार्थी गहू भरुन उभे असल्याची माहिती त्याने त्याच्या मोबाईल वरुन अंबरनाथचे शिधावाटप अधिकारी श्री. धामसे यांना दिली होती. त्याचे दोन्ही ट्रक रात्री ८.०० वाजेपासून दिनांक १९/१०/२०१२ सकाळी ९.०० वाजेपर्यंत जसेच्या तसे भरलेले उभे होते. कारण ट्रक खाली करण्यासाठी हमाल ९.३०

ते १०.०० च्या दरम्यांन येत असतात. ट्रक साई सेक्शन येथे भरलेले उभे असताना सकाळी ९.०० वाजता त्याचे ट्रकवरचे ड्रायव्हर गेले तेव्हा फ परिमंडळचे उपनियंत्रक व अंबरनाथचे शिधावाटप अधिकारी समवेत काही अधिकारी त्याच्या ट्रकची पाहणी व भरलेल्या धान्याची चौकशी करत होते. चौकशी करतांना त्याचा ट्रक ड्रायव्हर यांनी भिवंडी FCI मधून भरलेल्या गैरलाभार्थी गव्हाची चलन व पिवळा कलरची गेट पासची पावती दाखविली. यानंतर अधिकाऱ्यांनी सुरज ग्रेन असोशिएशनचे पदाधिकारी श्री. रावजी भिमजी बेरा (पटेल) यांना चौकशीसाठी बोलावून चौकशी केली. त्याचे ट्रक ड्रायव्हर व तो त्याच्या ट्रक समोरच उभे असून त्याला काहीच न कळवता संध्याकाळी ६.०० वाजता त्यांची चौकशी पूर्ण झाली. तुम्ही जाऊ शकता असे अधिकाऱ्यांनी सांगून पाठवून दिले व त्यांना न कळवता विचारता त्याच्या ट्रक ड्रायव्हर वर अंबरनाथच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला व त्याचे दोन्ही ट्रक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्याने व त्याच्या ट्रक ड्रायव्हरनी कोणताही गुन्हा केला नाही. त्याचे दोन्ही ट्रक अंबरनाथ शिधावाटप दुकानात गैर लाभार्थी गहु वितरण करण्यासाठी उभे होते. त्याचे ड्रायव्हरनी सदर ट्रकमधील एक दाणा देखील बाहेर विकला किंवा खाली केला नसून सुध्दा खोटा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचे सदरील दोन्ही ट्रक पोलिसांच्या ताब्यात असून त्याची रोजी रोटी बंद झालेली आहे. म्हणून आपण त्याचे ट्रक त्याला परत करण्याची कृपा करावी. सदरचा दाखल केलेला गुन्हा खोटा आहे हे सिध्द होईपर्यंत तो त्याचे ट्रक कोणालाही विकणार नाही असे तो आपल्याला सत्यप्रतिज्ञापत्र लिहून देत आहे. कारण त्याच्याकडे दुसरा कोणताही धंदा व्यवसाय नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

मोटार क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चा चालक रघुनाथ कसबे याचे दिनांक २१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, आपले कारणे दाखवा नोटीसमध्ये उल्लेखित ट्रक क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चा तो चालक आहे. दिनांक १८/१०/२०१२ रोजी अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रासाठी सुरज ग्रेन असोसिएशनच्या नावाने गैरलाभार्थी गव्हाचे २२० कट्टे भरुन तो भारतीय खाद्य निगमच्या भिवंडी आगारातून सायंकाळी ६.१५ वाजता निघाला व रात्री ८.०० वाजता अंबरनाथच्या साई सेक्शनमध्ये ट्रक पार्किंग करुन तो घरी आला. दिनांक १९/१०/२०१२ सकाळी ९.०० वाजता तो ट्रकमधील गहू वितरण करण्यासाठी ट्रकजवळ आला तेव्हा तेथे १०-१५ शिधावाटप अधिकारी त्याच्या व त्याच्या समवेत असून दोन उभे असलेल्या ट्रकची चौकशी करीत होते व फोटो काढत होते. तो ट्रकजवळ गेल्यानंतर अधिकाऱ्यांनी त्याला विचारले की, ट्रक इकडे का उभे केला, त्याने त्यांना सांगितले की, त्याच्या मालकांनी शिधावाटप अधिकारी यांना कळवून ट्रक येथे उभे केलेले आहे. यानंतर त्यांनी त्याच्याकडून चलन व गेट पास मागुन आपल्या ताब्यात घेतले व चौकशी झाल्यावर परत देण्यात येईल असे सांगितले. परंतू त्यांनी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत त्याला पेपर्स परत दिले नाही. तो त्याच्या मालकाला सांगून घरी निघून आला. त्याला दिनांक २०/१०/२०१२ रोजी सकाळी अंबरनाथ येथे आल्यावर पोलिसांनी बोलविल्यानंतर

CONTROLLER OF RATIONING HEAD MUMBAI

कळले की, त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याने कोणताही गुन्हा केला नसून त्याच्यावर आपल्या यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल केलेला आहे व पोलिसांसमोर फिर्यादमध्ये खोटा जबाब दिला आहे की, त्याने पाहिले सुध्दा रेशनिंगचा गहु रेशनिंग दुकानाच्या व्यतिरिक्त दुसऱ्या गोदामात विकला आहे. कारण रेशनिंगच्या धान्याच्या सर्व गाड्या शिधावाटप अधिकारी यांच्या देखरेखमध्ये व शिधावाटप निरीक्षक यांच्या समोर खाली होत आहे. तरी आपण सदर प्रकरणाची परत फेर तपासणी करुन आपल्या अधिकाऱ्यावर उचित कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.

मोटार ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा चालक असलम खान याचे दिनांक २१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, आपले कारणे दाखवा नोटीसमध्ये उल्लेखित ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा तो चालक आहे. दिनांक १८/१०/२०१२ रोजी अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रासाठी सुरज ग्रेन असोसिएशनच्या नावाने गैरलाभार्थी गव्हाचे २२० कट्टे भरुन तो भारतीय खाद्य निगमच्या भिवंडी आगारातून सायंकाळी ६.१५ वाजता निघालो व रात्री ८.०० वाजता अंबरनाथच्या साई सेक्शनमध्ये ट्रक पार्किंग करुन तो घरी आला. दिनांक १९/१०/२०१२ सकाळी ९.०० वाजता तो ट्रकमधील गहू वितरण करण्यासाठी ट्रकजवळ आला तेव्हा तेथे १०-१५ शिधावाटप अधिकारी त्याच्या व त्याच्या समवेत असून दोन उभे असलेल्या ट्रकची चौकशी करीत होते व फोटो काढत होते. तो ट्रकजवळ गेल्यानंतर अधिकाऱ्यांनी त्याला विचारले की, ट्रक इकडे का उभे केला, त्याने त्यांना सांगितले की, त्याच्या मालकांनी शिधावाटप अधिकारी यांना कळवून ट्रक येथे उभे केलेले आहे. यानंतर त्यांनी त्याच्याकडून चलन व गेट पास मागुन आपल्या ताब्यात घेतलें व चौकशी झाल्यावर परत देण्यात येईल असे सांगितले. परंतू त्यांनी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत त्याला पेपर्स परत दिले नाही. तो त्याच्या मालकाला सांगून घरी निघून आला. त्याला दिनांक २०/१०/२०१२ रोजी सकाळी अंबरनाथ येथे आल्यावर पोलिसांनी बोलविल्यानंतर कळले की, त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याने कोणताही गुन्हा केला नसून त्याच्यावर आपल्या यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल केलेला आहे व पोलिसांसमोर फिर्यादमध्ये खोटा जबाब दिला आहे की, त्याने पाहिले सुध्दा रेशनिंगचा गहु रेशनिंग दुकानाच्या व्यतिरिक्त दुसऱ्या गोदामात विकला आहे. कारण रेशनिंगच्या धान्याच्या सर्व गाड्या शिधावाटप अधिकारी यांच्या देखरेखमध्ये व शिधावाटप निरीक्षक यांच्या समोर खाली होत आहे. तरी आपण सदर प्रकरणाची परत फेर तपासणी करुन आपल्या अधिकाऱ्यावर उचित कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा चालक आरीफ मोहम्मद मणियार याचे दिनांक २१/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, आपले कारणे दाखवा नोटीसमध्ये उल्लेखित ट्रक क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा तो चालक आहे. दिनांक १८/१०/२०१२ रोजी अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रासाठी सुरज ग्रेन असोसिएशनच्या

नावाने गैरलाभार्थी गव्हाचे २२० कट्टे भरुन तो भारतीय खाद्य निगमच्या भिवंडी आगारातून सायंकाळी ६.१५ वाजता निघालो व रात्री ८.०० वाजता अंबरनाथच्या साई सेक्शनमध्ये ट्रक पार्किंग करुन तो घरी आला. दिनांक १९/१०/२०१२ सकाळी ९.०० वाजता तो ट्रकमधील गहू वितरण करण्यासाठी ट्रकजवळ आला तेव्हा तेथे १०-१५ शिधावाटप अधिकारी त्याच्या व त्याच्या समवेत असून दोन उभे असलेल्या ट्रकची चौकशी करीत होते व फोटो काढत होते. तो ट्रकजवळ गेल्यानंतर अधिकाऱ्यांनी त्याला विचारले की, ट्रक इकडे का उभे केला, त्याने त्यांना सांगितले की, त्याच्या मालकांनी शिधावाटप अधिकारी यांना कळवून ट्रक येथे उभे केलेले आहे. यानंतर त्यांनी त्याच्याकडून चलन व गेट पास मागुन आपल्या ताब्यात घेतले व चौकशी झाल्यावर परत देण्यात येईल असे सांगितले. परंतू त्यांनी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत त्याला पेपर्स परत दिले नाही. तो त्याच्या मालकाला सांगून घरी निघून आला. त्याला दिनांक २०/१०/२०१२ रोजी सकाळी अंबरनाथ येथे आल्यावर पोलिसांनी बोलविल्यानंतर कळले की, त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याने कोणताही गुन्हा केला नसून त्याच्यावर आपल्या यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल केलेला आहे व पोलिसांसमोर फिर्यादमध्ये खोटा जबाब दिला आहे की, त्याने पाहिले सुध्दा रेशनिंगचा गहु रेशनिंग दुकानाच्या व्यतिरिक्त दुसऱ्या गोदामात विकला आहे. कारण रेशनिंगच्या धान्याच्या सर्व गाड्या शिधावाटप अधिकारी यांच्या देखरेखमध्ये व शिधावाटप निरीक्षक यांच्या समोर खाली होत आहे. तरी आपण सदर प्रकरणाची परत फेर तपासणी करुन आपल्या अधिकाऱ्यावर उचित कार्यवाही करावी, अशी विनंती केली आहे.

मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा तथा मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा मालक सुदाम रामभाऊ सानप यांचे दिनांक २७/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, सुनावणीस तो स्वतः उपस्थित होता व मौखिक तसेच लेखी जबानी सुध्दा त्यांनी दिली आहे. सुनावणीमध्ये त्याची सुनावणी ऐकून घेतली व तेव्हा पासून आजपर्यंत त्याला कुठल्याही प्रकारची सुनावणीची ऑर्डर मिळालेली नाही. तसेच त्याचेकडे त्याच्या उदरनिर्वाहसाठी कोणतेही साधन व त्याचे ड्रायव्हर व तो बेरोजगार झालेला आहे. या गाड्यांबद्दल मे. सुरज ग्रेन डिलर्सकडे विचारणा केली तर ते सांगतात की, हेड ऑफिसमधून आम्हाला कुठल्याही प्रकारची गाड्यांबद्दल माहिती मिळालेली नाही. तरी आपणास विनंती की, आपण सदरहू गाड्याबद्दल सुनावणीची ऑर्डर देऊन ते स्वतः गाडीमालक लेखी स्वरुपात बॉन्ड लिहून देण्यास तयार आहे. तरी त्याला त्याच्या गाड्या परत द्याव्यात व यानंतर त्याच्याकडून कोणत्याही प्रकारच्या चुका घडणार नाहीत याची ते सत्यप्रत लिहून देणार आहेत. तरी त्यांच्या अर्जावर सहानभूतीपूर्वक विचार करुन निर्णय द्यावा, असे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १८/१०/२०१२ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकामार्फत साई सेक्शन विभागातील अनुग्रह सोसायटीच्या शिवम अपार्टमेंटमधील गाळ्यांमध्ये व गाळयासमोरील रस्त्यावर शासन नियंत्रित दराचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोरगरीब शिधापत्रिकाधारकांना अनुदानित दराने शिधापत्रिकेवर वितरीत करावयाचा अन्नधान्याचा साठा अनधिकृतरित्या खाजगी गोदामामध्ये गैरमार्गाने उतरवून घेऊन नियंत्रित वस्तूंची साठेबाजी करुन खुल्या बाजारात त्याची अवैध विक्री करुन ज्यादा नफेखोरीचा उद्देश स्पष्ट होत असल्याने संबंधितांनी आपापसात संगनमत करुन शासन नियंत्रीत दराचा गहू त्यांना दिलेल्या निर्देशानुसार अधिकृत शिधावाटप दुकानांना करावयाच्या साठा दुकानात पुरवठा केलेला नसल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा नोंद क्र. ।। १९/२०१२ दिनांक १९/१०/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन तीन मालमोटार व गव्हाचा साठा असा मिळून एकूण २३,२१,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव रावजी शामजी बेरा यांनी केलेल्या खुलाशात, दिनांक १८/१०/२०१२ रोजी सायंकाळी गैर लाभार्थी गव्हाचे पाच ट्रक अंबरनाथ शिधावाटप क्षेत्रात वितरण करण्यासाठी आले होते. सदर पाच ट्रकपैकीं दोन ट्रक त्याचदिवशी शिधावाटप दुकानांमध्ये वितरण करण्यात आले. त्याच्या ट्रकमध्ये त्यांनी किंवा त्यांच्या ड्रायव्हरनी एकही बाजका किंवा पोती शिधावाटप दुकानांशिवाय बाहेर उतरविलेला नाही. तरी आपल्या अधिकारी यांनी खोटा संशय धरुन थोड्यासा दुरी वर श्री. संजय अग्रवाल यांचा गोदाम आहे असे दाखवून त्या गोदामात सदरचा गाड्या खाली होणार होते असे खोटे संशय दाखवून त्यांच्या असोसिएशनवर व गाड्यांचा ड्रायव्हर वर खोटा फौजदारी गुन्हा दाखल केला, असे सांगितले.

मोटार क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चा चालक रघुनाथ कसबे, मोटार ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा चालक असलम खान व मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा चालक आरीफ मोहम्मद मणियार यांचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांनी कोणताही गुन्हा केला नसून त्यांच्यावर आपल्या यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी खोटा गुन्हा दाखल केलेला आहे व पोलिसांसमोर फिर्यादमध्ये खोटा जबाब दिला आहे की, त्यांनी पाहिले सुध्दा रेशनिंगचा गहु रेशनिंग दुकानाच्या व्यतिरिक्त दुसऱ्या गोदामात विकला आहे. तरी आपण सदर प्रकरणाची परत फेर तपासणी करुन आपल्या अधिकाऱ्यावर उचित कार्यवाही करावी, अशी विनंती केली.

गाळा क्र. १६ चे मालक संजय भगीरथमल अग्रवाल याचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक १९/१०/२०१२ रोजी त्याच्या मे. अग्रवाल ट्रेडर्स, गाळा नं. १६, अनुग्रह को.ऑप.हौ.सो., सत्यम बिल्डिंग, साई सेक्शन, अंबरनाथ (पूर्व), जिल्हा ठाणे या पत्त्यावर आपल्या कार्यालयाच्या दक्षता पथक यांनी त्याच्या गोदामावर धाड टाकली होती. त्याच्या गोदामात ८६ कट्टे (प्रत्येक ५० कि) गहुचा साठा होता. सदर गहु रेशनिंगचा नसून खुल्या बाजाराचा होता. परंतू आपल्या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी त्याच्याशी सदर गव्हाचे खरेदी बिल व काही कागदपत्रांची चौकशी न करता परस्पर त्याच्यावर फौजदारी गुन्हा अंबरनाथच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. II १९/२०१२ नोंदविण्यात आला, असे नमूद आहे.

उपरोक्त विवेचन लक्षात घेता गाळा क्र. १६ चे मालक, तिन्ही ट्रकचे चालक तसेच मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव रावजी शामजी बेरा यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे आहे. प्रस्तूत प्रकरणी, घटनास्थळी उपस्थित पथकाने पंचांसमवेत धाड टाकली असता जप्त तिन्ही ट्रकमधील अन्नधान्याचा साठा तेथे उपस्थित असलेले इसम काही मजुरांच्या सहाय्याने गाळा क्र. १६ मध्ये उतरवून घेण्याच्या तयारीत असताना पथकाने त्यांच्या दिशेने पाठलाग केला असता ट्रकमधील मजूर व ट्रक चालक हे अंधाराचा फायदा घेऊन ट्रक सोडून पळून गेले. तद्नंतर पथकाने गाळा क्र. १६ मध्ये प्रवेश करुन तपासणी केली असता, तेथे एकूण ८६ बाचकी गव्हाने भरलेला साठा आढळून आला आहे. सदर घटनेबाबत मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव रावजी शामजी बेरा यांनी घटनास्थळी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात, नेहमीप्रमाणे त्यांनी त्यांच्या तिन्ही ट्रकच्या चालकास घटनास्थळी ट्रक उभ्या करण्याच्या सुचना दिल्या. तद्नंतर ट्रक चालकांनी गाळा क्र. १६ मध्ये काही मजुरांच्या सहाय्याने सदर ट्रकमधील गव्हाच्या गोण्या उतरविण्याच्या तयारीत असताना अधिकारी उपस्थित झाल्याने त्यांचे तिन्ही चालक व मजुर अंधाराचा फायदा घेऊन पसार झाल्याचे सांगितले. तसेच सदरचा गाळा हा संजय अग्रवाल नामे इसमाचा असून यापूर्वीही शासन नियंत्रित दराचा अन्नधान्याचा साठा हा त्यांनी संजय अग्रवाल याने केलेल्या मागणीनुसार त्यास विक्री केल्याचे सांगून सद्यःस्थितीत सदर गाळ्यामधील अन्नधान्याचा साठा हा यापूर्वी केलेल्या विक्रीपैकीच असल्याचे कबूल केले आहे. सदरहू इसमांनी संगणमत करुन शासन नियंत्रित दराचा गव्हाचा साठा हा गोरगरीब शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता तो स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी व नफेखोरीच्या उद्देशाने काळा बाजारीने खरेदी/विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशन या संलग्न संस्थेची त्यांना नेमून देण्यात आलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांना अन्नधान्यांचा पुरवठा करण्याची जबाबदारी आहे. सदर प्रकरणी, नमूद संलग्न संस्थेचे पदाधिकाऱ्यांनी त्यांना शासनाच्या वतीने नेमून दिलेली जबाबदारी पार पाडताना त्यांनी अक्षम्य निष्काळजीपणा दाखवून त्यांच्या ताब्यात शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाचा अन्नधान्याचा साठा त्यांनी गैरमार्गाने विक्री केल्याचे सिध्द होत असल्याने त्यांनी शासनाची

विश्वासार्हता गमावल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७१/२०१२/जा.७४०, दिनांक २३/१०/२०१२ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मोटार ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ व मोटार ट्रक क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा मालक सुदाम रामभाऊ सानप यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, तो दोन्ही ट्रकचा मालक असल्याचे सांगून त्याच्या ट्रक ड्रायव्हर वर अंबरनाथच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येऊन दोन्ही ट्रक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्याने व त्याच्या ट्रक ड्रायव्हरनी कोणताही गुन्हा केला नाही. त्याचे दोन्ही ट्रक अंबरनाथ शिधावाटप दुकानात गैर लाभार्थी गहु वितरण करण्यासाठी उभे होते. त्याचे ड्रायव्हरनी सदर ट्रकमधील एक दाणा देखील बाहेर विकला किंवा खाली केला नसून सुध्दा खोटा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचे सदरील दोन्ही ट्रक पोलिसांच्या ताब्यात असून त्याची रोजी रोटी बंद झालेली आहे. त्याच्याकडे दुसरा कोणताही धंदा व्यवसाय नाही, असे सांगितले. तसेच मोटार ट्रक क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चे मालक यांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस पाचारण करुनही ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. यावरुन जप्त मोटार ट्रक क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त ट्रक परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

प्रस्तूत गुन्ह्यात वरील नमूद तिन्ही ट्रकचे चालक हे त्यांच्या ताब्यातील ट्रकमधील शासननियंत्रित दराचा गव्हाचा साठा हा गैरमार्गाने विक्री करण्यासाठी घटनास्थळी गाळा क्र. १६ मध्ये मजूरांच्या सहाय्याने उतरविण्याचा तयारीत असताना पथकातील अधिकारी उपस्थित होताच पळून गेले आहेत. सदर प्रकरणी ट्रकचे चालक हे ट्रक मालकांची भ्रमणध्वनीद्वारे संपर्कात होते. तसेच मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव यांनी घटनास्थळी दिलेल्या कबूली जबाबात त्यांनी नेहमी प्रमाणे नमूद ट्रकचे चालकास ट्रकमधील अन्नधान्याचा साठा हा घटनास्थळी असलेल्या गोदामात उतरविण्याच्या सुचना दिल्यानुसार नमूद तिन्ही ट्रकचे चालक हे गैरकृत्य करीत असल्याचे पंचासमक्ष आढळून आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी सर्व संबंधितांनी जप्त ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३, ट्रक क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ व ट्रक क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ मधील शासननियंत्रित दराचा गव्हाचा साठा हा प्रत्यक्षात नेमून दिलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानास न देता स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी गैरमार्गाने सदर ट्रकमधील गव्हाचा साठा हा काळाबाजारीच्या व नफेखोरीच्या उद्देशाने विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने त्यांनी उपभोक्ता तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी ट्रक मालकांच्या अपरोक्ष जरी चालकांनी

त्यांचे वाहनांचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर तिन्ही ट्रकच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे ट्रक त्यांच्या मालकास परत करण्याचा अथवा ट्रकचे मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे ट्रक जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा नोंद क्र. II १९/२०१२ दिनांक १९/१०/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) या कार्यालयाचे दिनांक २३/१०/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेले मोटार ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३, मोटार ट्रक क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ व मोटार ट्रक क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ ही वाहने शासनजमा करण्यात येत आहेत. सदरचे वाहनांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावेत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या 815
वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा चालक
२) मोटार क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ चा मालक
३) मोटार क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चा चालक
४) मोटार क्र. एमएच-१४-व्ही-४६०९ चा मालक
५) मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा चालक
६) मोटार क्र. एमएच-०४-बीयु-१४९५ चा मालक
७) गाळा क्र. १६ चे मालक संजय अग्रवाल
८) मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे सचिव रावजी शामजी बेरा
९) मे. सुरज ग्रेन डिलर्स असोसिएशनचे अध्यक्ष
१०) घटनास्थळी पळून गेलेले मजुर
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. ०२, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.